निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
२४ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# दावोसमध्ये महाराष्ट्राचे ३० लाख कोटींचे सामंजस्य करार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## महाराष्ट्रातील पत्रकारांशी व्हीसीच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांचा संवाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**दावोर्स/ प्रतिनिधी/** दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये महाराष्ट्राने ३० लाख कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले असून, आणखी १० लाख कोटींच्या गुंतवणूक करारांची प्राथमिक बोलणी पूर्ण झाली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना दिली. यातून ४० लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील पत्रकारांशी त्यांनी व्हीसीच्या माध्यमातून संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. या करारांपैकी ८३ टक्के करारांमध्ये थेट परकीय गुंतवणूक असून, एकूण १८ देशांमधून महाराष्ट्रात ही गुंतवणूक येते आहे. १६ टक्के गुंतवणूक ही परकीय तंत्रज्ञान भागिदारीत आहे. या १८ देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, जपान, स्वित्झर्लंड, स्वीडन, नेदरलँड, नॉर्वे, इटली, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, युएई, स्पेन, कॅनडा, बेल्जियम इत्यादींचा समावेश आहे. औद्योगिक, सेवा, कृषी, तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक येते आहे. सामंजस्य करार प्रत्यक्षात परावर्तित होण्याचा दर हा ७५ टक्के आहे. गेल्या वर्षीचे करार हे ७५ टक्के प्रत्यक्षात आलेले आहेत, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ही गुंतवणूक ३ ते ७ वर्षांत परावर्तित होत असते, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एसबीजी, ब्रुकफिल्ड, आर्सेलर




मित्तल, फिनमन ग्लोबल, इस्सार, स्कोडा ऑटो, फॉक्सवेगन, एसटीटी टेलिमीडिया, टाटा, अदानी, रिलायन्स, जेबीएल, कोकाकोला, बॉश, कॅपिटल लँड, आयर्न माऊंटेन अशा अनेक कंपन्यांशी हे करार झालेले आहेत. काही समूह हे भारतीय असले तरी त्यांची सुमारे १६५ देशांमध्ये गुंतवणूक आहे. क्वांटम काम्प्युटिंग, एआय, जीसीसी, डेटा सेंटर्स, आरोग्य, अन्न प्रक्रिया, ग्रीन स्टील, नगरविकास, जहाजनिर्माण, फिनटेक, लॉजिस्टीक, डिजिटल इन्फ्रा अशा सर्वच क्षेत्रात ही गुंतवणूक आली आहे.

**सर्वदूर गुंतवणूक :** कोकण, एमएमआरमध्ये २२ टक्के, विदर्भात १३ टक्के, तर ५० टक्के गुंतवणूक राज्याच्या इतर भागात आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, धुळे, अहिल्यानगर अशा सर्व भागात ५० हजार कोटी, मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये ५५,००० कोटी रुपये, कोकण प्रदेशात ३,५०,००० कोटी, नागपूर आणि विदर्भात २,७०,००० कोटी अशी प्रमुख आकडेवारी आहे. जायका, जेबीआयसी, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, स्टँडफोर्ड युनिव्हर्सिटीतील स्टँडफोर्ड बायोडिझाईन असे अनेक संस्थात्मक करार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. **अन्य भेटीगाठी :** झिम्बांब्वे परराष्ट्र व्यवहार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री प्रो. ॲमोन मुरविरा यांनी महाराष्ट्राच्या सौरऊर्जा क्षेत्रातील प्रगतीची एका परिषदेत मुक्तकंठाने प्रशंसा केली. या परिषदेला मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते.

ॲलन टुरिंग इन्स्टिट्यूट मिशन संचालक ॲडम सोबे यांची मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट घेत त्यांच्याशी वाहतूक क्षेत्राबाबत चर्चा केली. कार्बन उत्सर्जन कमी करुन स्वच्छ आणि भविष्याच्या गरजा भागवता येतील, अशा उपाययोजनांबाबत ही चर्चा झाली. अरुप समूहाच्या अध्यक्ष हिल्डे टोन यांच्याशी नगरविकासाच्या विविध पैलूंवर, इंडो-इटालियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे ॲलेसेन्ड्रो ग्युईलानी यांच्यासोबत परस्पर सहकार्य वाढवण्यावर यावेळी चर्चा झाली.

### मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमीचा विकास!

मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करणार असून मुंबईतील पाणी, हवा याचे प्रश्न यातून सोडविण्यात येतील. सर्व प्रकारच्या वेस्टवर प्रक्रिया झाली पाहिजे, हा प्रयत्न यातून करण्यात येणार आहे. पुढे हीच संकल्पना सर्व मोठ्या शहरांमध्ये नेण्यात येईल. मुंबईत पुढच्या २ ते ३ वर्षात हा परिणाम आपण दाखवू शकू. रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा याच दावोसमध्ये करण्यात आली. या ग्रोथ सेंटरमुळे एक बिझनेस डिस्ट्रीक्ट तयार होईल. यात १ लाख कोटींची गुंतवणूक कालच आली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### देशातील पहिली इनोव्हेशन सिटी

टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करणार आहोत, येणाऱ्या ६ ते ८ महिन्यात याचे सविस्तर नियोजन होईल. ही संकल्पना गेल्याच वर्षी दावोसमध्ये आली होती. टाटा सन्सचे एन. चंद्रशेखरन यांच्यासोबत याबाबत चर्चा झाली. यासाठी १ लाख कोटींहून अधिक गुंतवणूक टाटा करणार आहेत. इतरही अनेक देशातील गुंतवणूकदार यासाठी गुंतवणूक करणार आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भातील समितीस ४ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला, या समितीच्या कार्यकाळास दि. ५ जानेवारी पासून दि. ४ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीसाठी (एक महिना) मुदतवाढ देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

या समितीस दि. १५ डिसेंबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये दि. ५ डिसेंबर, २०२५ ते ४ जानेवारी, २०२६ या कालावधीकरिता एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, समितीचे कामकाजाप्रित्यर्थ समितीच्या संकेतस्थळावर विविध जनसामान्यांमार्फत प्राप्त प्रश्नावली व मतावलीद्वारे प्राप्त प्रतिसाद यावर विचारविमर्श व पुढील विश्लेषण करण्याच्या कार्यवाहीसाठी आता ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, यांनी दि. २ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये सद्यस्थितीतील सुरू असलेल्या इतर कामकाजाच्या अनुषंगाने समितीच्या कार्यकाळास मुदतवाढ मिळणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. तसेच समितीस एक महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविले होते. त्यास अनुसरून त्रिभाषा धोरण समितीच्या कार्यकाळास एक महिना मुदतवाढ देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

### प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळांमध्ये देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त येत्या २६ जानेवारी रोजी राज्यातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये



एकाचवेळी 'देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेवर आधारित असणाऱ्या या कवायती शासकीय ध्वजवंदन कार्यक्रमानंतर होणार असून यामध्ये राज्यातील एक लाखांहून अधिक शाळांमधून, सात लाखापेक्षा जास्त शिक्षकांच्या उपस्थितीत सुमारे दोन कोटींपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली. विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त, आरोग्य जागृती, शारीरिकदृष्ट्या कसरत/ व्यायाम करण्यासाठी प्रेरित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

याबाबत मंत्री भुसे यांनी मंत्रालयात माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यावेळी उपस्थित होते. मंत्री भुसे म्हणाले, या कवायतींचा कालावधी साधारतः १५ ते २० मिनिटांचा असेल. यासाठी सर्व शाळांना नमुना मार्गदर्शक व्हिडीओ पुरविण्यात आलेला असून सध्या प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांचा सामूहिक स्वरुपात कवायत संचलन सराव करून घेण्यात येत आहे. प्रजासत्ताक दिनी सामूहिक कवायत संचलन असल्यामुळे गावातील, शहरातील मैदानाच्या क्षमतेनुसार विद्यार्थी शाळेत अथवा एका मैदानावर एकत्र करून कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. कार्यक्रमास परिसरातील लोकप्रतिनिधी, अधिकारी, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी, पालक व समाजसेवी गणमान्य प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या सरावासाठी प्रत्येक १० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक मार्गदर्शनासाठी नेमण्यात आलेला आहे.

मंत्री भुसे म्हणाले, हा कार्यक्रम देशभक्तीमय वातावरणात होणार असून शालेय शिक्षण आयुक्त हे या कार्यक्रमाचे सर्व व्यवस्थापन पाहत आहे. आजारी, अशक्त, दिव्यांग अशा विद्यार्थ्यांना कवायत करण्याची सक्ती नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी आदींनी या कार्यक्रमासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## महाराष्ट्रात गुटखाबंदीसाठी स्वतंत्र कायदा आणणार

### अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्रात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांवर पूर्ण बंदी घालण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात येणार आहे. गुजरातमध्ये लागू असलेल्या दारूबंदी कायद्याच्या धर्तीवर यासंदर्भात अभ्यासाअंती आवश्यक प्रस्ताव सादर करून कायद्याचा मसुदा तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.

गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थांवरील कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे प्रधान सचिव धीरज कुमार, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे पाटील, विधि व न्याय विभागाचे सहसचिव महेंद्र जाधव, गृह विभागाचे सहसचिव राहुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस महासंचालक सागर पाटील यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यात गुटखा व प्रतिबंधित अन्नपदार्थांची अवैध विक्री रोखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात अन्न व औषध प्रशासन व गृह विभागाच्या संयुक्त पथकाची स्थापना करण्याचे तसेच अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांविरोधात 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव मांडल्याचे सांगितले. अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ म्हणाले की, राज्यात गुटखा व तत्सम प्रतिबंधित पदार्थांच्या उत्पादन, वितरण व विक्रीवर बंदी आहे. अवैध व्यवहारावर अधिक कठोर कायदेशीर कारवाईसाठी गुटखा विक्रेत्यांवर मकोका लागू करण्याबाबत कायद्यात आवश्यक दुरुस्त्या करून गुटखा व्यवसायाशी संबंधित गुन्ह्यांनाही 'मकोका'च्या कक्षेत आणण्यासाठी कायदा अधिक कठोर केला जाणार आहे.

## संस्कृती, मराठी भाषा आणि तंत्रज्ञानाचा समन्वय काळाची गरज: मंत्री आशिष शेलार

### पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत ३ दिवसीय व्याख्यानमाला

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** सार्वजनिक उत्सव, व्याख्यानमाला आणि सांस्कृतिक उपक्रम हे समाज, संस्कृती, राष्ट्र आणि एकता यांना एकत्र आणणारे प्रभावी माध्यम आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या दीर्घ परंपरेप्रमाणेच बौद्धिक समृद्धी देणाऱ्या व्याख्यानमालांची परंपरा शासनाने पुढे नेण्याचा निर्णय घेतला असून, त्यातील हा पहिला उपक्रम आहे, असे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार म्हणाले.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेचा शुभारंभ सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार यांच्या उपस्थितीत रवींद्र नाट्यमंदिर येथे झाला. या व्याख्यानमालेच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, ज्येष्ठ लेखक, विचारवंत आणि अभ्यासक अच्युत गोडबोले, सल्लागार समितीचे सदस्य, डॉ. शिरीष ठाकूर आणि सोनिया परचुरे यावेळी उपस्थित होते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना



सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार म्हणाले की, आज प्रत्येक नागरिकाचा तंत्रज्ञानाशी थेट संबंध आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सद्वारे मोठ्या प्रमाणावर माहिती संकलित होत असून, या तंत्रज्ञानाचा योग्य, सुरक्षित आणि सकारात्मक वापर कसा करायचा हे समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. या विषयावर अच्युत गोडबोले यांच्यासारख्या अभ्यासू वक्त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख करताना सांस्कृतिक कार्य मंत्री ड. शेलार यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या सक्रिय प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला. महाराजांची 'रयतेचा राजा' आणि 'उपभोगशून्य स्वामी' ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात महाराष्ट्राला यश आले, याचा अभिमान असल्याचेही ते म्हणाले. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर साहित्य, लोककला, लोकसंगीत, विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध क्षेत्रांतील मराठी निर्मितीला चालना देण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असल्याचे मंत्री ड. शेलार यांनी सांगितले. राज्यात वर्षभरात १२०० हून अधिक सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जात असून, ही महाराष्ट्राची सांस्कृतिक 'सॉफ्ट पॉवर' असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक जोगळेकर म्हणाल्या की, गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर संपूर्ण राज्यभर वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून व्याख्यानमाला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या व्याख्यानमालेंतर्गत ज्येष्ठ लेखक, विश्लेषक व अभ्यासक अच्युत गोडबोले 'ए आय तंत्रज्ञान व कलाविश्व' या विषयावर संवाद साधला. २३ जानेवारी रोजी पुरातत्वशास्त्रज्ञ आणि पुरातत्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांच्या युनेस्को नामांकनाचा रोमांचक प्रवास' आणि २४ जानेवारी रोजी मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी 'अभिजात मराठी : इतिहास वर्तमान व भविष्य' या विषयांवर संवाद साधणार आहेत.

## प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष निनादणार

### गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' चित्ररथ सज्ज

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/ प्रतिनिधी/** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त राजधानीतील कर्तव्यपथावर होणाऱ्या भव्य पथसंचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ सज्ज झाला असून, यंदा राज्याच्या वतीने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या




ऐतिहासिक पार्श्वभूमीवर यंदाचा सोहळा विशेष ठरणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत संचलनात सहभागी होणारा महाराष्ट्राचा हा चित्ररथ राज्याची प्रदीर्घ परंपरा आणि वाढत्या आर्थिक सामर्थ्याचे दर्शन अवघ्या जगाला घडवेल.

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तिच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण या चित्ररथात करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५ पासून सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली असून, या उत्सवामुळे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर पर्यावरणीय आणि आर्थिक आत्मनिर्भरतेसही कशी चालना मिळते, हे या चित्ररथातून ठळकपणे मांडण्यात आले आहे.

**कसा असेल चित्ररथ?**

महाराष्ट्राच्या या चित्ररथाची रचना अत्यंत कलात्मक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. चित्ररथाच्या अग्रभागी महाराष्ट्राच्या ऊर्जेचे प्रतीक असलेला एक भव्य ढोल आणि तो वाजवणारी पारंपारिक वेशभूषेतील महिला राज्याच्या प्रबळ स्त्रीशक्तीचे दर्शन घडवेल. चित्ररथाच्या मध्यभागात गणपतीची देखणी मूर्ती साकारणारा मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेला गणेशभक्त दर्शवण्यात आला आहे. चित्ररथाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, इतर सांस्कृतिक बाबींचेही बारकाव्यांसह दर्शन घडवण्यात आले आहे. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस पारंपारिक नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांचे लेझीम पथक असेल.

यंदाचा हा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर आयोजित होणाऱ्या 'भारत पर्व'मध्ये देखील देशवासियांना महाराष्ट्राच्या या सांस्कृतिक समृद्धीचा आणि आत्मनिर्भरतेच्या प्रवासाचा आनंद घेता येणार आहे.

# मतदार : भारतीय लोकशाहीचा आत्मा



२५ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय मतदार दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका औपचारिक शासकीय कार्यक्रमापुरता मर्यादित नसून भारतीय लोकशाहीच्या आत्म्याशी जोडलेला एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक आणि राजकीय संदर्भ आहे. लोकशाही व्यवस्थेची खरी ओळख तिच्या संविधानात, संस्थांमध्ये किंवा कायद्यांमध्ये नसून तिच्या मतदारांमध्ये असते. मतदार हा लोकशाहीचा कणा आहे. त्याच्या जाणीवेवर, सहभागावर आणि सामाजिक भानावर लोकशाहीची दिशा ठरते. म्हणूनच राष्ट्रीय मतदार दिन हा केवळ मतदार नोंदणी किंवा मतदानाची प्रक्रिया आठवण करून देणारा दिवस नसून, मतदार म्हणून नागरिकाची सामाजिक, नैतिक आणि राजकीय भूमिका पुन्हा तपासण्याचा एक महत्त्वाचा क्षण आहे.

भारतीय लोकशाहीचा प्रवास हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वात विविधतेने भरलेला लोकशाही प्रयोग मानला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारण्याचा निर्णय घेतला, तो केवळ राजकीय नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातूनही क्रांतिकारी होता. त्या काळात भारतात निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते, दारिद्र्य व्यापक होते आणि जात, वर्ग, लिंग व धर्माच्या आधारे समाज खोलवर विभागलेला होता. अशा परिस्थितीत प्रत्येक प्रौढ नागरिकाला समान मताचा अधिकार देणे हे केवळ धाडसीच नव्हे, तर सामाजिक समतेवर आधारित लोकशाहीची ठाम भूमिका मांडणारे पाऊल होते. या निर्णयामुळे भारतीय समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि उपेक्षित घटकांना राजकीय मंचावर स्थान मिळाले आणि सत्तेच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता लोकशाही ही केवळ शासनाची पद्धत नसून ती एक व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजातील मूल्ये, परंपरा, सत्तासंबंध, आर्थिक रचना आणि सांस्कृतिक घटक यांचा लोकशाहीवर खोल परिणाम होत असतो. मतदार हा या सर्व घटकांच्या संगमातून घडलेला असतो. व्यक्तीचे मतदानवर्तन हे केवळ तिच्या वैयक्तिक पसंतीवर आधारित नसते, तर तिच्या सामाजिक ओळखीवर, जीवनानुभवांवर आणि सामूहिक वास्तवावर आधारित असते. जातीय रचना, वर्गीय विषमता, शैक्षणिक संधी, रोजगाराची स्थिती, लिंगसंबंध आणि माध्यमांचा प्रभाव या सर्वांचा मतदानावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो.

भारतीय राज्यघटनेने मतदाराला केवळ मताचा अधिकार दिला नाही, तर त्या अधिकारामागे सामाजिक न्यायाची आणि समतेची व्यापक संकल्पना मांडली. संविधानातील समानतेचे तत्त्व, मूलभूत हक्क आणि राज्याची मार्गदर्शक तत्त्वे ही सर्व मतदाराच्या सशक्तीकरणाशी जोडलेली आहेत. मतदानाच्या माध्यमातून नागरिक केवळ प्रतिनिधी निवडत नाही, तर तो शासनाच्या दिशेला, धोरणांना आणि प्राधान्यांना आकार देतो. त्यामुळे मत देणे हा केवळ अधिकार नसून तो एक सामाजिक कर्तव्य आहे, असे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ठामपणे म्हणता येते.

राष्ट्रीय मतदार दिनाची संकल्पना मतदार नोंदणी वाढविणे, मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणे या उद्देशाने राबविली जाते. मात्र लोकशाहीची गुणवत्ता केवळ मतदानाच्या टक्केवारीवर मोजता येत नाही. माहितीपूर्ण, विवेकी आणि जबाबदार मतदान ही खरी लोकशाहीची कसोटी असते. आजच्या काळात माध्यमांचा वाढता प्रभाव, जाहिराती, सोशल मीडिया, भावनिक प्रचार आणि ओळखींचे राजकारण यामुळे मतदाराच्या निर्णयप्रक्रियेवर अनेक प्रकारचे दबाव निर्माण होत आहेत. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते की जेव्हा माहिती अपुरी, एकांगी किंवा चुकीची असते, तेव्हा मतदान भावनांवर आधारित होते आणि लोकशाहीची गुणवत्ता घसरते.

मतदान संस्कृती ही कोणत्याही समाजाच्या लोकशाही परिपक्वतेचे प्रतिबिंब असते. मतदान ही केवळ निवडणुकीच्या दिवशी पार पाडायची प्रक्रिया नसून ती दीर्घकाळ घडत जाणारी सामाजिक संस्कारांची प्रक्रिया आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालये, समाज, माध्यमे आणि सार्वजनिक चर्चेच्या माध्यमातून मतदानाबाबतची मूल्ये आणि भूमिका घडत असतात. ज्या समाजात मतभिन्नतेचा सन्मान केला जातो, प्रश्न विचारण्याची मुभा असते आणि विवेकी चर्चेला स्थान असते, त्या समाजात मतदान अधिक सशक्त आणि अर्थपूर्ण ठरते. याउलट ज्या ठिकाणी भीती, दबाव, प्रलोभन किंवा संकुचित ओळखी प्रभावी असतात, तेथे मतदानाची प्रक्रिया मर्यादित होते.

भारतीय समाजात मतदान संस्कृती हळूहळू विकसित होत गेली आहे. सुरुवातीच्या काळात अनेक नागरिकांसाठी मतदान ही नवीन आणि अपरिचित संकल्पना होती. कालांतराने निवडणुकांची सातत्यपूर्ण प्रक्रिया, राजकीय चळवळी आणि सामाजिक जागरूकता यामुळे मतदान हे नागरिकत्वाचे महत्त्वाचे लक्षण बनले. तरीही आजही काही भागांत जातीय समीकरणे, स्थानिक सत्तासंबंध, आर्थिक प्रलोभने आणि दबाव मतदानावर प्रभाव टाकताना दिसतात. या वास्तवाकडे डोळसपणे पाहूनच लोकशाही अधिक सुदृढ करण्याचे प्रयत्न करावे लागतील.

महिलांचा मतदानातील सहभाग हा समाजातील लिंगसमानतेचा आणि सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो. भारतात दीर्घकाळ महिलांना सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवले गेले होते. पितृसत्ताक रचना, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक बंधने यामुळे महिलांचा राजकीय सहभाग मर्यादित राहिला. मात्र स्वातंत्र्यानंतर सार्वत्रिक मताधिकारामुळे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला आणि हळूहळू त्यांच्या सामाजिक भूमिकेत बदल घडू लागला. गेल्या काही दशकांत महिलांच्या मतदानाचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. अनेक निवडणुकांमध्ये महिला मतदारांचे प्रमाण पुरुषांच्या बरोबरीने किंवा काही वेळा त्याहून अधिक आढळते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता हा बदल महिलांच्या शिक्षणात वाढ, आर्थिक सहभाग, स्वयं-सहायता गट, स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षण आणि वाढते सामाजिक आत्मभान यांचा परिणाम आहे.

तरुण मतदार हा भारतीय लोकशाहीचा भविष्यकाळ आहे. भारताची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर तरुण असून १८ ते २९ वयोगटातील मतदारांची संख्या लक्षणीय आहे. तरीही अनेक वेळा तरुणांमध्ये मतदानाबद्दल उदासीनता दिसून येते. बेरोजगारी, अस्थिर रोजगार, स्थलांतर, शिक्षणाचा ताण आणि राजकारणाबद्दलची नाराजी यामुळे काही तरुण लोकशाही प्रक्रियेपासून दूर राहतात. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते की जेव्हा तरुणांना राजकारणात आपले प्रश्न, आकांक्षा आणि भविष्य प्रतिबिंबित होताना दिसत नाही, तेव्हा ते मतदानाकडे पाठ फिरवतात. मात्र पर्यावरण, सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, भ्रष्टाचारविरोधी चळवळी आणि नागरिक हक्क यांसारख्या मुद्द्यांवर तरुणांचा सहभाग वाढत असल्याचेही स्पष्टपणे दिसते. राष्ट्रीय मतदार दिन हा तरुणांना माहितीपूर्ण, चिकित्सक आणि सक्रिय मतदार म्हणून घडविण्याची एक महत्त्वाची संधी आहे.

ग्रामीण आणि शहरी मतदारांच्या वर्तनात समाजशास्त्रीय फरक स्पष्टपणे आढळतात. ग्रामीण भागात अजूनही नातेवाईक संबंध, स्थानिक नेतृत्व, जातीय रचना आणि थेट संपर्क यांचा प्रभाव अधिक असतो. शहरी भागात माध्यमे, विकासाचे मुद्दे, पायाभूत सुविधा, रोजगार आणि जीवनशैलीशी संबंधित प्रश्न अधिक प्रभावी ठरतात. तथापि, शिक्षण, संपर्क, स्थलांतर आणि तंत्रज्ञानाच्या वाढीमुळे हे विभाजन हळूहळू कमी होत आहे. ग्रामीण भागातही मुद्देसूद आणि जाणीवपूर्वक मतदान वाढत आहे, तर शहरी भागातही भावनिक आणि ओळखींचे राजकारण काही प्रमाणात प्रभावी ठरत आहे. त्यामुळे मतदार वर्तन हे स्थिर नसून सतत बदलणारे सामाजिक वास्तव आहे.

मतदार शिक्षण आणि जनजागृती कार्यक्रमांची भूमिका लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. निवडणूक आयोगाने मतदार नोंदणी, मतदान प्रक्रिया, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यांविषयी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रभावी मतदार शिक्षण हे केवळ तांत्रिक माहितीपुरते मर्यादित नसावे. त्यात राज्यघटनेची मूल्ये, मूलभूत हक्क व कर्तव्ये, सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांचा समावेश असणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि माध्यमांनी दीर्घकालीन पातळीवर मतदार शिक्षणासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

लोकशाही व्यवस्थेतील विश्वास हा एक नाजूक पण अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मतदारांचा निवडणूक प्रक्रिया, राजकीय संस्था आणि लोकप्रतिनिधींवर विश्वास असेल तर लोकशाही सुदृढ राहते. भ्रष्टाचार, अपारदर्शकता, खोटे आश्वासने आणि नैतिकतेचा अभाव यामुळे हा विश्वास डळमळीत होऊ शकतो. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे स्पष्ट होते की जेव्हा लोकांना व्यवस्था आपली वाटत नाही, तेव्हा ते मतदानापासून दूर राहतात किंवा निष्क्रिय बनतात. त्यामुळे राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने लोकशाही संस्थांवरील विश्वास पुनर्स्थापित करणे ही सामूहिक जबाबदारी आहे.

मतदान न करणे हाही एक सामाजिक संदेश असतो. अनेकदा मतदान न करण्यामागे निराशा, पर्यायांचा अभाव किंवा व्यवस्थेवरील अविश्वास कारणीभूत असतो. परंतु ही निष्क्रियता लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. मतदान न केल्याने निर्णय इतरांच्या हाती जातो आणि प्रतिनिधित्वातील तफावत वाढते. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपल्या मताचे सामाजिक आणि राजकीय महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. लोकशाहीत बदल घडविण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे मतपत्रिका हे राष्ट्रीय मतदार दिन ठामपणे अधोरेखित करतो.

डिजिटल युगात लोकशाहीसमोर नव्या संधी आणि आव्हाने उभी आहेत. सोशल मीडिया, ऑनलाइन माहिती आणि डिजिटल संवादामुळे नागरिकांचा सहभाग वाढू शकतो. मात्र त्याचबरोबर चुकीची माहिती, अफवा, द्वेषपूर्ण प्रचार आणि ध्रुवीकरण यांचे धोकेही वाढले आहेत. समाजशास्त्रीयदृष्ट्या डिजिटल साक्षरता ही आधुनिक मतदार साक्षरतेचा अविभाज्य भाग बनली आहे. माहितीची पडताळणी, विवेकी विचार आणि जबाबदार अभिव्यक्ती या कौशल्यांशिवाय लोकशाहीची गुणवत्ता टिकविणे कठीण आहे. शेवटी असे म्हणता येईल की राष्ट्रीय मतदार दिन हा भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा उत्सव आहे. मतदार हा केवळ निवडणुकीतील एक घटक नसून तो समाजपरिवर्तनाचा सक्रिय वाहक आहे. विविधतेने भरलेल्या भारतीय समाजात मतदार लोकशाहीला व्यापक, सर्वसमावेशक आणि सजीव बनवतो. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने आपला मताधिकार हा केवळ हक्क नव्हे, तर सामाजिक कर्तव्य म्हणून स्वीकारावा. माहितीपूर्ण, नैतिक, जागरूक आणि जबाबदार मतदार घडविणे हीच सशक्त, स्थिर आणि न्याय्य लोकशाहीची खरी हमी आहे.

– **डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल - bagate.rajendra5gmail.com

# पैसा देखील बोलतो?

पैसा...... पैसा आजची महत्वपुर्ण गरज. तो असेल तर सारेच आनंदात. तो नसेल तर दुःख. तो असेल तर सारेच पाप पुण्यात बदलतात आणि तो नसेल तर पुण्यही पाप बनतं. कारण पैसा बोलतो. पैसाच माणूसकी दाखवतो आणि पैसाच चारचौघात बसवतो. तो जर नसेल तर त्या माणसाची कुणी इज्जत करीत नाही. परंतु तो असून जो माणूसकी विसरतो. त्याच्यासाठी पैसा हा कर्दनकाळच बनतो व त्याला चारचौघांतूनच नाही तर जगातून उठवत असतो. हे तेवढंच खरं आहे.



अलिकडील काळात पैशाला अतिशय मोठं महत्व आलेलं आहे. पैशाशिवाय कोणत्याही गोष्टी घडत नाहीत. कोणती एखादी वस्तू घेतो म्हटल्यास ती घेता येत नाही. आपल्या पत्नीला व मुलाबाळांना सुखाचं आयुष्य देता येत नाही.

पैसा...... हा पैसा अतिशय महत्वाची आजच्या काळातील गरज. पैसा नसेल तर काहीच साध्य होत नाही. कोणाचा अपघात झालाच तर त्या व्यक्तीला वाचविण्यासाठी रुग्णालयाचा खर्च करतांना पैशाचाच वापर करता येतो. पैसा असेल तर बरेच दिवस एखाद्या व्यक्तीला जगवता येतं.

बरेच लोकं म्हणतात नव्हे तर समज आहे की पैसा हा बोलतो. अन् ते खरंही आहे. ज्यांच्याजवळ पैसा असतो. त्याला गर्व असतो. असं वाटतं की तोच अतिशय गर्भ श्रीमंत आहे. बाकी त्याच्याएवढं कोणीच श्रीमंत नाही. असाच एक माझ्या पाहण्यात आलेला व्यक्ती आहे की त्याच्याजवळ पैसा आला की तो कोणालाच मोजत नाही. वस्तीत सतत इतर सर्वांशी भांडत असतो. त्याचं कारण आहे पैसा. त्याच्याजवळ असलेला पैसा हा त्याला भांडायची ताकद देत असतो. याचाच अर्थ असा की त्याच्याजवळील पैसा हा बोलत असतो.

पैसा हा बोलतोच. राजकारणातही पैसा बोलतोच. पैसा जर असेल तर ओळखीचा नसलेला व कामे न करणाराही उमेदवार निवडून येतो. जर प्रत्येक मतदारांच्या खिशात हिरव्या हिरव्या नोटा टाकल्या तर....... पैशामुळं माणसाची इज्जत होते.

पैसा मृत्युवेळेसही कामात येतो. समजा एखादा व्यक्ती मरण पावलाच तर त्याला दहनघाटापर्यंत नेतांना पैसाच कामात येत असतो. चार खांदे जरी मिळवायचे असतील तर पैसाच कामात येतो. कारण गरीबांच्या तिरडीलाही कुणी हात लावायला तयार नसतात. त्यातच दहनघाटावर नेल्यानंतर त्या ठिकाणी त्या प्रेताचा अंतिम संस्कार पार पाडतांना लागणाऱ्या लाकडासाठी पैसाच मोजावा लागतो आणि त्यांच्या मृत्युचं प्रमाणपत्र बनवायलाही पैसाच लागतो. शिवाय तिरडी बनवणे. तिरडी सजविणे इत्यादीसारख्या किरकोळ गोष्टींसाठी पैसाच खर्च करावा लागतो.

पैसा हा जन्म घेण्यासाठीही लागतोच. कारण निःशुल्क बाळंतपण होत नाही आजच्या काळात. अगदी गरोदर असण्यापासून पैसा लागतो. कारण एकदा का भ्रूण गर्भात शिरला की त्याच्या वाढीसाठी अन् ते भ्रूण कसं आहे? व्यवस्थित आहे की नाही. इत्यादी चाचण्या करण्यासाठी पैसाच लागत असतो. त्यानंतर त्या भ्रूणाची व्यवस्थित वाढ व्हावी यासाठीही पैसा खर्च होतो. शिवाय ज्यावेळेस बाळंतपण येतं. तेव्हा आपल्याला आणि गर्भाला अजिबात त्रास होवू नये. यासाठीही चांगलं रुग्णालय पाहिलं जातं. असं चांगलं रुग्णालय शोधत असतांना पैशाचाच वापर होत असतो. पुढं बाळाचा जन्म झाला की नाव ठेवणे आले. त्यानंतर त्याचे वाढदिवस सुरु होतात दरवर्षी. या सर्व प्रक्रियेसाठी पैसाच लागतो. त्यातच असं भ्रूण पुढं तीन वर्षाचं झालं की त्याला शिक्षणासाठी चांगल्या शाळेत टाकणं आलं. त्यानंतर चांगल्या मातब्बर शाळेचं शुल्कही तेवढंच जास्त असतं. पुढं तेच भ्रूण शिकलं. लहानाचं मोठं झालं की त्याच्या नोकरीसाठी प्रयत्न केले जातात. या नोकरीसाठीही पै पै पैसा मोजावा लागतोच. चांगल्या सुखाच्या शहरातील नोकरीसाठी कितीतरी लाखो रुपये द्यावे लागतात. त्यानंतर विवाहाचा खर्च. जेवढा व्यक्ती श्रीमंत. तेवढा विवाह थाटात केला जातो. त्यासाठी कितीतरी प्रमाणात पैशाची नासाडी होते. कारण तसा पैसा खर्च करुन धुमधडाक्यात विवाह करणे. याला आपल्या इज्जतीचं लक्षण समजलं जातं. एकंदरीत सांगायचं झाल्यास पैसा हा अतिशय महत्त्वपूर्ण भाग आहे माणसाच्या जीवनातील.

पैसा माणसाच्या अतिशय कामाची असलेली वस्तू. पैशाशिवाय जग चालूच शकत नाही. त्यातच पैसा हा कुणाचा जीव नक्कीच वाचवू शकतो. कारण पैसा बोलतो. जसा एखादा व्यक्ती आपल्या अतिशय जवळचा असेल आणि त्याचा अपघात झाला तर माणूस म्हणतो की जेवढे पैसे लागेल. तेवढे मी लावायला तयार आहे. परंतु जीव वाचलाच पाहिजे. हे आपण बोलत असतांना आपल्या तोंडून असे बोल का निघतात? त्याचं कारण आहे, आपल्याजवळ असलेला पैसा. परंतु हे जरी खरं असलं तरी पैसा हा सारस्वत नाही. हं, ठीक आहे की पैशाशिवाय जीवन जगणं असह्य आहे. पैसा हा कुणाचा जीव वाचवू शकतो. परंतु वेळप्रसंगी हाच पैसा आपल्या कामात पडत नाही. एखाद्या व्यक्तीजवळ कितीही पैसा असेल तरी त्या व्यक्तीजवळचा तो अतिरिक्त पैसा त्याच्या जवळच्या नातेवाईकांचा जीव वाचवू शकत नाही. हं, हे ठीक आहे की पैसा असेल तर न्यायाधीश एखाद्या व्यक्तीला फाशी देतांना न्यायालय मध्यरात्रीही उघडतं. परंतु याचा अर्थ असा नाही की पैसे जरी असतील आणि न्यायालय जरी रात्री उघडत असेल तरी त्या कैद्याची फाशी थांबवता येईल? त्याला फाशीच होत असते. हे आपणही पाहिले. तसेच कितीही पैसा असेल तरी एखाद्या अपराधी व्यक्तीला होणारी अटक तो पैसा थांबवू शकत नाही. अन् कितीही पैसा असेल तरी वेळेवर मारलेला अटॅक हा मृत्यूचे कारण बनतो.

महत्वपुर्ण बाब ही की पैसा बोलतोच. राजकारणात बोलतो. राजकारणात निवडणुकीत उभे राहतांना जो उमेदवार जास्त पैसा पार्टीफंड म्हणून देईल. त्याला उमेदवारी मिळते. जो व्यक्ती उमेदवारी मिळताच जास्त पैसा खर्च करेल, तो जिंकून येतोच. न्यायालयातही पैशाच्या माध्यमातून खोटे पुरावे बनवले जातात. न्यायाधीशांना विकत घेवून न्याय बदलवला जातो. याचाच अर्थ असा की पैसा बोलतोच. तसाच वस्तीत एखाद्या व्यक्तीजवळ पैसा असेल तर त्याचा धाक असतोच वस्तीत. लोकं त्याच्या वाट्याला जात नाहीत. याचाच अर्थ असा की पैसा बोलतोच. परंतु पैसा बोलतो याचा अर्थ असा की की एखाद्यानं त्याचा गैरवापर करुन त्याच्या वापरातून गैरकृत्य करावं. आजची काही मंडळी पैशाच्या माध्यमातून गैरकृत्यही करतात. बिचाऱ्या गरीबांच्या गरीबीचा फायदा घेण्यासाठी माणूसकी सोडून वागतात ते. लाचार असलेल्या गरीब घरच्या सुंदर मुलींना पैशाची जेव्हा गरज भासते. तेव्हा याच मुलींना, श्रीमंत घरची मुलं पैशाच्या भरवशावर नाशवतात. त्यांना प्रलोभणे व खोटी आश्वासने देवून त्यांच्याशी गैरकृत्य करतात. त्यातच कधी कधी याच पैशाच्या भरवशावर पाशवी बलात्कारही. ते नराधम तेवढ्यावरच थांबत नाहीत तर पैशाच्या भरवशावर कधीकधी त्यांची हत्या करतात. एवढंच नाही तर तशा स्वरुपाच्या हत्या करुनही असे नराधम पैशाच्या भरवशावर पोलीस ठाणेही बांधून टाकतात आणि जर कधी पोलीस ठाणे बांधली गेली नाही तर चक्कं न्यायालयाचीच बांधणी करुन टाकतात. मातब्बर महागड्या वकिलांना केस देतात. ज्यातून गैरकृत्य करुनही त्यांना बा इज्जत बरी होता येतं.

पैसा बोलतो, याचा अर्थ पैसा हा गरीबांची तोंड चूप करतो. गरीबांना श्रीमंतांकडून दिली जाणारी अल्पशी रक्कम ही उपकार ठरते नव्हे तर ठरवली जाते. त्या उपकारात माणूसकी नसतेच. परंतु माणूसकीचा कांगावा केला जातो. अन् माणुसकीही पैशाच्या भरवशावर विकत घेतली जाते.

पैसा ही गरज आहे. तो जर असेल तर अख्खं आयुष्य हे ऐषआरामात जात असतं आणि पैसा जर असेल तर साऱ्या इच्छा पुर्ण होत असतात. त्यातच पैसा नसेल तर आपल्या मनातील सर्व इच्छेवर पाणी फेरावं लागतं. काही काही इच्छा बालपणापासूनच दाबल्या जातात. लहानपणी खेळणीसाठी तकादा लावणाऱ्या मुलांना पैसे नसल्यानं बाप खेळणी घेवून देवू शकत नाही. अशावेळेस त्याला त्याचे वडील ते मूल चूप राहावं म्हणून थापड मारतात. परंतु त्याचे लाड पुरवीत नाहीत.

विशेष म्हणजे पैसा हा अतिशय महत्वाचा असून पैसा हेच जीवन आहे. पैसा जर नसेल तर माणसाचं जीवन जगणं अर्थशुन्य होवून जातं. कधी पैशाअभावी माणसं रस्त्यावर येत असतात. त्यांना फुटपाथवर आयुष्य काढावं लागतं. अन् पैसा नसेल तर जीवनाची मजाच संपून जाते.

महत्वपुर्ण बाब ही की पैसा हे जीवन आहे. पैसाच सर्वोत्तम आहे माणसांच्या जीवनाला आकार देत असतांना, जीवनाला आकार देण्यासाठी. परंतु हे जरी खरं असलं तरी पैसा हा सर्वश्रेष्ठ नाही. पैसा नसला तर माणूस जगूच शकत नाही, असे नाही. हे साध्या प्राणीमात्रावरुन तपासून पाहता येईल. त्यांच्याजवळ पैसा नसतोच. तरी ते जगतातच. चांगलं अर्थपुर्ण जीवन जगतात. तेव्हा जरी पैसा नसेल तरी जगता येत असतं. त्यामूळं पैसा जरी नसेल तरी वाईट वाटून घेवू नये. अन् ज्यांच्याकडे पैसा असेल त्यांनी माजून जावू नये. कारण नदीचं पाणी पूरत नाही तर हा पैसा आहे. तोही कालांतरानं नष्ट होतोच. माज जर मनात आला तर........ रावणाजवळ त्यानं कुबेराकडून हिरावलेली लंका होती. परंतु ती जास्त काळ रावणाजवळ टिकली नाही. ती लवकरच विभीषणाला मिळाली. त्याच्या सोन्याच्या लंकेचा त्याला जास्त दिवस उपयोग झाला नाही वा त्याला सोन्याच्या लंकेचा जास्त दिवस उपभोग घेता आला नाही.

पैसा हा नष्ट होतो, जर आपल्यात अहंकार आला तर....... तेव्हा पैसा बोलता है म्हणत कुणावर त्याच्या उपलब्धतेनं अत्याचार करु नये. गैरकृत्य करु नये. बलात्कार करुन कुणाचं जीवन उध्वस्त करु नये. अन् कुणाला विनाकारण त्रास देवू नये. त्यातच माणूसकी सोडूनही वागू नये. कारण पैसाच आपल्याला चारचौघात बसवतो आणि पैसाच आपल्याला चारचौघातून उठवत असतो.

पैसा...... पैसा आजची महत्वपुर्ण गरज. तो असेल तर सारेच आनंदात. तो नसेल तर दुःख. तो असेल तर सारेच पाप पुण्यात बदलतात आणि तो नसेल तर पुण्यही पाप बनतं. कारण पैसा बोलतो. पैसाच माणूसकी दाखवतो आणि पैसाच चारचौघात बसवतो. तो जर नसेल तर त्या माणसाची कुणी इज्जत करीत नाही. परंतु तो असून जो माणूसकी विसरतो. त्याच्यासाठी पैसा हा कर्दनकाळच बनतो व त्याला चारचौघांतूनच नाही तर जगातून उठवत असतो. हे तेवढंच खरं आहे.

– **अंकुश शिंगाडे,** नागपूर ९३७३३५९४५०

# शेतकऱ्यांच्या मोबदल्यात समानता आणा, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

राष्ट्रीय महामार्गांसाठी संपादित होणाऱ्या जमिनीच्या मोबदल्यात शेतकऱ्यांसोबत होणारा दुजाभाव आणि अन्यायकारक कायदेशीर प्रक्रियेवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एकाच देशात, एकाच कामासाठी जमीन संपादित करताना दोन वेगवेगळे कायदे आणि मोबदल्याच्या दोन वेगवेगळ्या पद्धती का? असा थेट सवाल करत न्यायालयाने केंद्र सरकारला या कायद्याचा पुनर्विचार करून समानता आणण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे देशभरातील शेतकऱ्यांना, विशेषतः जालना जिल्ह्यातील देवमूर्ती येथील समृद्धी महामार्गासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आलेल्या एका प्रकरणात, राष्ट्रीय महामार्ग कायदा, अंतर्गत होणारे भूसंपादन आणि नवीन भूसंपादन कायदा, २०१३अंतर्गत होणारे भूसंपादन, यांतील मोबदला निश्चितीच्या प्रक्रियेत मोठी तफावत असल्याचे निदर्शनास आले. महामार्ग कायद्यानुसार, जिल्हाधिकारी किंवा सरकारी अधिकारी लवाद म्हणून काम पाहतात आणि त्यांच्या निर्णयाविरोधात अपील करण्याची संधी अत्यंत मर्यादित असते.

याउलट, नवीन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार शेतकऱ्यांना न्यायिक अधिकाऱ्यांसमोर दाद मागण्याचा हक्क मिळतो, जिथे पुराव्यांचे पुनर्मूल्यांकन करून जमिनीचा योग्य बाजारभाव ठरवला जातो. ही तफावत शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असून, यामुळे त्यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण होत असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले. एकाच प्रकारच्या भूसंपादनासाठी शेतकऱ्यांमध्ये असा भेदभाव करणे हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३००-अ च्या भावनेच्या विरोधात असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे.

या ऐतिहासिक निरीक्षणावर बोलताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे हे निरीक्षण म्हणजे देशभरातील शेतकऱ्यांच्या लढ्याला मिळालेले मोठे यश आहे. सरकार विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करते, पण मोबदला देताना दुजाभाव करते. महामार्ग कायद्यातील त्रुटींमुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही आणि त्यांना न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे आता कायद्यात सकारात्मक बदल होण्याची शक्यता आहे, असे ड. धनावत म्हणाले.

ड. धनावत यांनी जालना जिल्ह्यातील प्रश्नाकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, जालना जिल्ह्यातील देवमूर्ती गावातील शेतकरी समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनात योग्य मोबदला मिळावा यासाठी अनेक दिवसांपासून आंदोलन करत आहेत. त्यांनाही याच कायदेशीर भेदभावाचा सामना करावा लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाने आता थेट केंद्र सरकारलाच कायदा बदलण्यास सुचवल्याने, या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. सरकार आतातरी या शेतकऱ्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करेल, अशी अपेक्षा आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात कोणताही अंतिम निकाल दिलेला नाही, तर देशाचे टर्नी जनरल यांना या प्रकरणात लक्ष घालण्यास सांगितले आहे. कायद्यातील ही विसंगती दूर करून देशभरातील शेतकऱ्यांना समान न्यायाचे तत्व लागू करण्यासाठी सरकारने एक सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवावा, अशी अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केली आहे. यामुळे भविष्यात होणाऱ्या सर्व भूसंपादन प्रक्रियांमध्ये एकवाक्यता आणि पारदर्शकता येण्यास मदत होईल.

न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करत काही याचिकाकर्त्यांना दिलासा दिला आहे, ज्यांनी उच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे आपल्या याचिका मागे घेतल्या होत्या. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांचे हक्क अबाधित राहतील, हा विश्वास दृढ झाला आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ एप्रिल २०२६ रोजी होणार असून, तोपर्यंत या प्रकरणातील अंतरिम आदेश कायम राहतील. तोपर्यंत केंद्र सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण देशाचे, विशेषतः जालना जिल्ह्यातील आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे सरकारवर कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा दबाव निश्चितच वाढला आहे.

## संक्षिप्त

### नैराश्यात जाऊन शफेपूर येथील शेतकऱ्याने आपले जीवन संपवले

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी.सुनिल निकम/** कन्नड तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतातील मका पिकास कोंब फुटल्याने पूर्ण मका पिक हातचे गेले. त्यामुळे आर्थिक संकट आल्याने नैराश्यात जाऊन कन्नड तालुक्यातील शफेपूर येथील शेतकरी कृष्णा रावजी दवगे यांनी दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी आपले जीवन संपवले होते. ही घटना अत्यंत विदारक असतानाही तीन महिने उलटून गेले तरी प्रशासनाकडून त्यांच्या कुटुंबाला एक रुपयाचीही मदत मिळालेली नाही.

शेतकरी आत्महत्या झाल्यानंतर तत्काळ मदत, चौकशी व आर्थिक सहाय्य देण्याचे केवळ कागदावरचे नियम प्रत्यक्षात कुठेच दिसत नाहीत. आज दवगे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. आमच्या दुःखाची कोणालाच पर्वा नाही. आत्महत्या झाल्यावरही शासनाला वेळ नाही, असे संतप्त मत दवगे कुटुंबीयांनी व्यक्त केले आहे. प्रशासनाने आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटुंबाची थट्टा लावली असल्याची भावना कुटुंबीयांमधून व्यक्त होत आहे.

प्रशासन, महसूल विभाग आणि कृषी विभाग यांच्यातील ढिसाळपणाचा फटका पुन्हा एकदा एका गरीब शेतकरी कुटुंबाला बसला आहे. फोटो, पंचनामे आणि आश्वासने यापलीकडे शासनाची भूमिका शून्य असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आत्महत्या झाल्यावरही मदत नसेल तर अशा योजनांचा उपयोग काय? असा सवाल उपस्थित होत असून, तात्काळ आर्थिक मदत, कर्जमाफी व कुटुंबीयांच्या पुनर्वसनाची मागणी जोर धरू लागली आहे.

### २,१९,१०० रुपये किंमतीचा गुटखा एम आय डी सी पैठण पोलीसांची धडाकेबाज कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/प्रतिनिधि.हारून शेख/** ईश्र्वर जगदाळे सहायक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे एम आय डी सी पैठण यांना गोपनिय माहिती प्राप्त झाली की, छत्रपति संभाजीनगर ते पैठण रोडने संभाजीनगर कडुन पैठण कडे एक जितु माल वाहतुक करणारे वाहनात किरणा सामानाच्या खाली लपवुंन गुटख्याची अवैध वाहतुक करीत आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सपोनि/ ईश्र्वर जगदाळे यांनी तात्काळ सदर वाहणावर कारवाई करणे कामी पथक पाठवुन पथकाला खात्री करुन कारवाई करणे बाबत सुचना दिल्या होत्या.सदर पथकाने सापळा रचुन वाहन थांबवले सद्दर वाहन चालकास नाव - पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव नागेश रामनाथ लांडे वय ३३ वर्ष रा. पाटेगाव ता.पैठण असे सांगीतला त्याला गाडीत काय आहे असे विचारले असता त्याने किराणा सामान असल्याचे सांगीतले.गाडीची पाहणी केली असता बाहेरून सदर गाडीमध्ये पुर्ण किरणा सामान भरलेली दिसत होती. त्यावेळी गाडी चालकास गाडीत सामानामध्ये गुटखा आहे का? अशी विचारणा केली असता त्याने गुटखा नसल्याचे सांगीतले परंतु त्याच्या बोलण्यावरुन व हालचालीवरुन संशय निर्माण झाल्याने गाडीतील सामन खाली उतरवुन चेक केले असता किरणा सामानाच्या खाली गुटखा लपवुन ठेवल्याचे दिसुन आले.सदर वाहन व गुटखा असा एकुण

२,१९,१००/ रुपये किंमतीचा माल जप्त करुन आरोपीने प्रतिबंधीत केलेला गुटखा विक्री करीता स्वत:च्या ताब्यात बाळगुन वाहतुक करीत असताना मिळुन आल्याने गुन्हा नोंद करून आरोपीस अटक करून न्यायालयाकडुन ०१ दिवसाचा पी.सी.आर मिळाला असुन इतर आरोपी निष्पन्न करून सदर आरोपीवर कारवाई करण्यात येणार आहे. सद्दरची कामगिरी पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड,अपर पोलीस अधिक्षक अन्नपूर्णा सिंह, विभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/ईश्वर जगदाळे,पोउपनि/बुरकुल, पोकॉ/२३७ गुडेकर,पोकॉ/२३५ उगले,यांनी केली आहे.

### खेळ व कलेच्या माध्यमातून मुलांच्या सृजनशीलतेला चालना मिळते : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** खेळ व कलेच्या माध्यमातून मुलांच्या सृजनशीलतेला चालना मिळते तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

महिला व बालविकास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवाचा समारोप व बक्षीस वितरण कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्रभारी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती कोमल कोरे, बाल विकास प्रकल्प अधिकारी शहरी एन. डी. वामन यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, अभ्यासासोबतच खेळ, चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्यकला यांसारख्या उपक्रमांमुळे मुलांमध्ये कल्पकता, आत्मविश्वास, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात. खेळांमधून शिस्त, संयम व सहकार्याची भावना रुजते, तर कलेतून भावना व्यक्त करण्याची क्षमता वाढते.आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांचा ताण कमी करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले. पालक व शिक्षकांनी मुलांच्या आवडीनिवडी ओळखून त्यांना खेळ व कलेच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्यासाठी संधी द्यावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले.

पोलीस मुख्यालयाच्या मैदावर दिनांक १९ ते २१ जानेवारी या दरम्यान चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात जिल्हयातील शासकीय व स्वयंसेवी बालगृहातील मुलांनी सहभाग घेतला होता.

या तीन दिवसीय महोत्सवामध्ये मैदानी खेळामधे कब्बडी, १०० मी. धावणे, गोळा फेक, थाळी फेक, लिंबु-चमचा, पोत्यामधुन चालने तसेच इनडोअर खेळामध्ये - कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला, निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच आज दिनाक २१ जानेवारी रोजी मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणुन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये विद्याथ्यांने एकल गायन, समूह गायन, नृत्या कला मध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमामध्ये सर्व विजेत्यांना व सहभागी विद्याथ्यांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# सिडको कार्यालयाचा 'नग्न' कारभार!

## ३ महिन्यांपासून छळणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात रमेश पाटलांचे 'वस्त्रत्याग' आंदोलन



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** जनतेची सेवा करण्यासाठी स्थापन झालेली सरकारी कार्यालये आता भ्रष्टाचाराचे अड्डे बनली आहेत का? असा संतप्त सवाल आज छत्रपती संभाजीनगरमध्ये उपस्थित झाला. शहरातील सिडको कार्यालयात सुरू असलेल्या उघड वसुलीला कंटाळून, रमेश पाटील या त्रस्त नागरिकाने चक्क सरकारी दालनात कपडे काढून आंदोलन केले. गेल्या तीन महिन्यांपासून अर्जावर साधी सही करण्यासाठीही पैशांची मागणी करणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून हे आंदोलन करण्यात आले.

**खुर्चीला चिकटलेले अधिकारी आणि 'वसुली' टोळी**

या कार्यालयातील अनेक कर्मचारी आणि अधिकारी गेल्या अनेक वर्षांपासून एकाच जागी ठाण मांडून बसले आहेत. नियमानुसार बदल्या का होत नाहीत? याचे उत्तर आता स्पष्ट झाले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, वरिष्ठांच्या 'वसुली'साठी हे अनुभवी खेळाडू बदलले जात नाहीत. भ्रष्टाचाराची ही साखळी इतकी मजबूत आहे की, सरकार आणि वरिष्ठ प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

**शिपायापासून प्रशासकापर्यंत 'रेट कार्ड' फिक्स?**

सिडको कार्यालयात सध्या 'विना दक्षिणा दर्शन नाही' अशी स्थिती असल्याचा खळबळजनक आरोप आंदोलकांनी केला आहे. सामान्य माणसाच्या कामासाठी शिपायापासून ते थेट वरिष्ठ प्रशासकापर्यंत ठराविक टक्केवारी (कमिशन) ठरलेली आहे. पैसे दिल्याशिवाय फाईल एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर सरकत नाही. रमेश पाटील यांनी गेल्या तीन महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही, केवळ चिरीमिरी दिली नाही म्हणून त्यांना वारंवार चकरा मारायला लावण्यात आल्या. अखेर प्रशासनाच्या या जाचाला कंटाळून त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

**घोटाळ्यांचे माहेरघर: भूखंड आणि दुरुस्तीचा बनाव**

सिडकोच्या कारभारात केवळ लाचखोरीच नाही, तर मोठे घोटाळेही शिजत असल्याचे बोलले जात आहे:

मोक्याचे भूखंड नाममात्र दरात मर्जीतील लोकांना विकले जात आहेत.सिडकोची अनेक घरे पडक्या अवस्थेत असताना, त्यांच्या दुरुस्तीच्या नावाखाली कागदावर कोट्यवधींचा खर्च दाखवून भ्रष्टाचार सुरू असल्याची चर्चा आहे. मोठी कामे 'सेटल' होतात, मात्र गरिबांच्या घराच्या छोट्या कामांसाठी पैशांची मागणी केली जाते.

**आता तरी सरकार जागे होणार का?**

रमेश पाटील यांच्या या अनोख्या आंदोलनाने सिडको कार्यालयातील भ्रष्टाचाराचे वाभाडे काढले आहेत. भर कार्यालयात एका नागरिकाला आपले कपडे उतरवावे लागणे, हे लोकशाहीसाठी लज्जास्पद आहे. आता या भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होणार की नेहमीप्रमाणे चौकशीचे नाटक करून प्रकरण दाबले जाणार? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.जर लोकशाहीच्या मंदिरात सामान्य माणसाला न्याय मिळत नसेल आणि अधिकारी केवळ पैशांचेच सगेसोयरे असतील, तर जनतेने आता रस्त्यावर उतरून अशा भ्रष्ट व्यवस्थेचे कपडे काढण्याची वेळ आली आहे.

### छत्रपती संभाजीनगरमध्ये सिकलसेलमुक्तीसाठी 'विशेष अभियान पंधरवडा'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** शहरातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आणि अनुवंशिक आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने कंबर कसली आहे. महानगरपालिका आयुक्त श्री. जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या मार्गदर्शनानुसार शहरात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' राबविण्यात येत आहे.

सिकलसेल ॲनिमिया हा एक रक्ताशी संबंधित अनुवंशिक आजार आहे. या आजाराचे वेळीच निदान व्हावे, रुग्णांना योग्य उपचार मिळावेत आणि भविष्यातील पिढीला यापासून वाचवता यावे, या हेतूने हे अभियान आयोजित करण्यात आले आहे. या पंधरवड्यात प्रामुख्याने जनजागृती, मोफत तपासणी आणि समुपदेशन या त्रिसूत्रीवर भर दिला जाणार आहे.

महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांवर ० ते ४० वर्षे वयोगटातील नागरिकांसाठी खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्राथमिक स्तरावर सर्वांची 'सिकलसेल सोल्युबिलिटी टेस्ट' (Solubility Test) केली जाईल.ज्या नागरिकांचे अहवाल संशयास्पद असतील, त्यांना पुढील निदानासाठी क्ष्ल्ड्ड आणि Electrophoresis या चाचण्यांचे मार्गदर्शन व सुविधा दिली जाईल.रुग्ण आणि आजाराचे वाहक (Carriers) यांची स्वतंत्र नोंदणी करून त्यांना आरोग्य पत्रिका दिल्या जातील.निदान झालेल्या रुग्णांना तज्ज्ञांमार्फत योग्य औषधोपचार व सल्ला दिला जाईल.

महानगरपालिका आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शहरात आतापर्यंत ९४,९०३ नागरिकांची सिकलसेल तपासणी यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. या अभियानाद्वारे ही व्याप्ती आणखी वाढवण्याचा प्रशासनाचा मानस आहे.सिकलसेलचा प्रसार रोखण्यासाठी केवळ उपचार पुरेसे नसून प्रतिबंधात्मक उपाय महत्त्वाचे आहेत. यासाठी महानगरपालिकेतर्फे: १. विवाहपूर्व समुपदेशन: तरुण मुला-मुलींनी लग्नापूर्वी आपली सिकलसेल स्थिती तपासून घ्यावी, यासाठी विशेष सत्रे घेतली जाणार आहेत. २. गर्भधारणापूर्व समुपदेशन: गरोदर मातांची तपासणी करून बाळाला हा आजार होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय सुचवले जातील.

### जळगावहून तिरुपतीसाठी विमान सेवा सुरु करा; अजय पाटील यांची मुरलीधर मोहोळ यांच्याकडे मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव (प्रतिनिधी)** उत्तर महाराष्ट्राचे महत्त्वाचे व्यापारी केंद्र असलेल्या जळगाव शहरातून थेट तिरुपतीसाठी विमान सेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी भाजप जिल्हा युवा मोर्चाचे चिटणीस अजय पाटील यांनी केंद्रीय विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन नामदार मोहोळ यांनी दिले आहे.जळगाव जिल्हा हा खान्देशातील व्यापाराचा मोठा केंद्रबिंदू आहे. जळगावसह शेजारील धुळे, नंदुरबार, बुलडाणा आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव व सिल्लोड तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविक तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी जात असतात. तसेच शेजारील मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर जिल्ह्यातील नागरिकांचीही जळगाव विमानतळावर मोठी भिस्त असते.सध्या जळगाव विमानतळावरून तिरुपतीसाठी थेट विमान सेवा उपलब्ध नसल्याने, भाविकांना लांबचा रेल्वे प्रवास करावा लागतो किंवा इतर शहरांमार्गे विमान प्रवास करावा लागतो. यात वेळ आणि पैसा दोन्हीचा मोठा अपव्यय होत असून भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.



मुरलीधर मोहोळ यांचे सकारात्मक आश्वासन

भाविकांची ही गरज ओळखून अजय पाटील यांनी दिल्ली येथे केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेतली. जळगाव विमानतळावर उपलब्ध असलेल्या सोयीसुविधा आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, तिरुपतीसाठी तातडीने सेवा सुरू करण्याची मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली.

जळगाव आणि परिसरातील हजारो भाविकांची श्रद्धा तिरुपती बालाजीवर आहे. या मार्गावर विमान सेवा सुरू झाल्यास केवळ भाविकांचीच नाही, तर व्यावसायिकांचीही सोय होईल. नामदार मोहोळ यांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

**- अजय पाटील, चिटणीस, भाजप जिल्हा युवा मोर्चा**

या विमान सेवेमुळे उत्तर महाराष्ट्रातील दळणवळणाला नवी गती मिळण्याची शक्यता असून, भाविकांमध्ये या मागणीमुळे आशा पल्लवित झाल्या आहेत.

# वाल्मी प्रशासनाचा 'कारभार' चव्हाट्यावर; कोट्यवधींच्या देयकांनंतर आता 'टक्केवारी'साठी अडवणूक?

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** राज्यातील जलसंधारण आणि प्रशिक्षणात महत्त्वाचे स्थान असलेल्या पैठण रोडवरील 'वाल्मी' (थ-ङ्चख) संस्थेत पुन्हा एकदा भ्रष्टाचाराचे भूत मानगुटीवर बसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. माजी प्रशासकांच्या कार्यकाळातील ५ कोटी ५६ लाखांच्या संशयास्पद देयकांचे प्रकरण ताजे असतानाच, आता नवीन प्रशासक आणि अभियंत्यांनी 'टक्केवारी'साठी कंत्राटदारांची अडवणूक सुरू केल्याचा गंभीर आरोप होत आहे.




**जुना भ्रष्टाचार: मोजमाप पुस्तिका गायब, कारवाई कागदावरच?**

मिळालेल्या माहितीनुसार, वाल्मीच्या पूर्वीच्या प्रशासकांनी आपल्या नातेवाईकांच्या नावावर कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष कामे न करता सुमारे ५ कोटी ५६ लाख रुपयांची देयके लाटल्याचा आरोप आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या कामांच्या मोजमाप पुस्तिका (MB - Measurement Books) देखील उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याऐवजी प्रशासनाने केवळ 'तुलनात्मक' आणि किरकोळ कारवाई करून प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा कंत्राटदारांमध्ये आहे.

**नवीन शक्कल: 'वरिष्ठांच्या नावाखाली' वसुली?**

काही अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर नवीन प्रशासक आणि अभियंत्यांनी कारभार हाती घेतला आहे. मात्र, सुधारणेऐवजी भ्रष्टाचाराची पद्धत बदलल्याचे आरोप कंत्राटदार करत आहेत.लेखी आदेशाशिवाय कामे बंद: अनेक कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश (Work Order) मिळालेले असतानाही, त्यांना तोंडी सूचना देऊन कामे बंद करण्यास भाग पाडले जात आहे.

टक्केवारीचा खेळ: जे कंत्राटदार ठराविक 'टक्केवारी' देण्यास तयार आहेत, त्यांचीच कामे सुरू ठेवण्यास मुभा दिली जात आहे. वरिष्ठांचे नाव सांगून कंत्राटदारांना वेठीस धरले जात आहे, प्रत्यक्षात वरिष्ठ कार्यालयाकडून कामे थांबवण्याबाबत कोणतेही लेखी पत्र नसल्याचे समजते.

**मर्जीतील लोकांना कंत्राट देण्याचा घाट?**

जुन्या कंत्राटदारांची कामे विनाकारण रेंगाळत ठेवून त्यांचे कार्यादेश रद्द करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. हीच कामे पुन्हा आपल्या मर्जीतील आणि जवळच्या कंत्राटदारांना देण्यासाठी हा सर्व खटाटोप सुरू असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे प्रामाणिक कंत्राटदारांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, वाल्मीच्या विकासकामांना खीळ बसली आहे.


**कामाचे आदेश असूनही आम्हाला काम करू दिले जात नाही. वरिष्ठांचे नाव सांगून टाळाटाळ केली जाते आणि आडवळणाने पैशांची मागणी केली जाते. हा थेट भ्रष्टाचार असून याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. -**

**- पीडित कंत्राटदार**

**(नाव न छापण्याच्या अटीवर)**

या प्रकरणाची दखल जलसंपदा विभाग आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग घेणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### भाजपाचे मनोहर सोनवणे यांनी घेतली हातात शिवसेनेची मशाल



**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी / सरफराज पटेल/** जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर फुलंब्री तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलली आहेत.

बाबरा जिल्हा परिषद गटातून भाजपकडून उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेले स्थानिक नेते मनोहर सोनवणे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मंगळवारी प्रवेश केला आहे.

**बाबरा गटातुन जिल्हा परिषदसाठी लढणार**

माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि उपनेते सुभाष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी हरिदास सोनवणे,सतीश सोनवणे, भगवान चव्हाण यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी 'शिवबंध' बांधले.

निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत सोनवणे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात भाजपसमोर आव्हान उभे राहिले आहे.

याचा निकालावर काय परिणाम होतो, याकडे लक्ष लागले आहे. बाबरा गटात ३१ हजार ५०० मतदार आहेत.बाबरा जिल्हा परिषद गटातून भाजपने जितेंद्र जैस्वाल यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

त्यामुळे मनोहर सोनवणे हे नाराज झाले होते.

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर**

**यांचे कार्यालय**

**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**

ई-मेल- aurangabad.eemahapwd.gov.in दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०२४/प्र.क्र.१४४ / इमा-२ दिनांक - २८/०२/२०२४**

**ई निविदा सूचना क्रं. ४०२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर (दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नॉदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in

२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)

३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

जिमाका / छ. स. न. जाहि / ५४१ / २०२५-२०२६

**स्वाक्षरीत/-**

**कार्यकारी अभियंता**

**सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर**

# प्रजासत्ताक दिनी आरोग्य कर्मचाऱ्याचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

**शासन आदेशान्वये कायम सेवेची संधी हेतुपूरस्सर डावलल्याचा आरोप, वर्षभरापासून न्यायाची प्रतीक्षा**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** शासन आदेशान्वये कायम सेवेची संधी मिळणे अपेक्षित असलेल्या जिल्ह्यातील १० कंत्राटी कर्मचाऱ्यांची नौकरी संबधितांनी कटकारस्थान रचून डावलल्याचा गंभीर आरोप करत सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषीवर कारवाई करत आपणास न्याय देण्यात यावा या मागणीसाठी प्रशासकीय कारभारास वैतागलेले आरोग्य कर्मचारी इरफान बद्रोद्दीन शेख यांनी प्रजासत्ताक दिनी (ता.२६) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा ईशारा दिला आहे.

याबाबत मा.जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अर्जात इरफान बद्रोद्दीन शेख (रा.शेवगा,ता.अंबड) यांनी जिल्हा शल्यचिकित्सक,जालना यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप केले असून शासन आदेशानुसार आपल्याला कायम सेवेत समावेश होण्याची संधी असतांनाही ती संधी जाणीवपूर्वक डावलण्यात आल्याचे त्यांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे. या प्रकारामुळे संबंधित जिल्ह्यातील १० कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असून त्यांना न्याय मिळावा,यासाठी त्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबल्याचे स्पष्ट केले आहे.इरफान शेख यांनी यापूर्वी १२ डिसेंबर २०२५ रोजी आपल्या तक्रार अर्जाची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयात केली होती.



त्या अर्जात त्यांनी नमूद केले की,जिल्हा शल्यचिकित्सक जालना यांनी कटकारस्थान करून शासनाने आपल्याला दिलेली कायम सेवेची संधी डावलली आहे. शासन निर्णय,नियम व अटींचे उल्लंघन करून काही विशिष्ट व्यक्तींना लाभ देण्यात आल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. या संदर्भात शेख यांनी आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथील मा.आयुक्त आरोग्य सेवा यांच्याकडेही लेखी तक्रार दाखल केली आहे.या तक्रारीत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी अहवालाची प्रत अर्जदारास पाठवावी,अशी स्पष्ट मागणी करण्यात आली होती.मात्र मोठा कालावधी लोटूनही या प्रकरणी कोणताही प्रतिसाद किंवा लेखी उत्तर मिळाले नसल्याने अर्जदारांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सदर प्रकरण अत्यंत गंभीर असूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे दिसून येते.त्यामुळे संबंधित कर्मचारी न्यायापासून वंचित राहात आहे.शासन स्तरावर तक्रार दाखल करूनही दखल घेतली जात नसेल, तर सामान्य नागरिकाने न्याय कुठे मागायचा,असा सवाल शेख यांनी उपस्थित केला आहे.

या प्रकरणामुळे प्रभावित झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्नही ऐरणीवर आला असून अनेक वर्षे सेवा बजावल्यानंतर शासन आदेशानुसार कायम सेवेत सामावून घेण्याची अपेक्षा असताना,कथित कट कारस्थानामुळे त्यांची संधी हिरावून घेतली गेल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले असून शेख यांनी स्पष्ट केले आहे की,न्याय मिळविण्यासाठी त्यांनी सर्व कायदेशीर व प्रशासकीय मार्ग अवलंबून पाहिले. मात्र,कोणताही ठोस प्रतिसाद न मिळाल्याने शेवटी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घ्यावा लागला. त्यामुळे प्रजासत्ताक दिनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततामय मार्गाने आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.या उपोषणाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून घेऊन संबंधित प्रकरणाची तात्काळ चौकशी सुरू करावी,दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी,तसेच अन्यायग्रस्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन आदेशानुसार कायम सेवेचा लाभ द्यावा,अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

### जिल्हा प्रशासन कर्मचाऱ्याला न्याय देणार की दोषींना पाठीशी घालणार

शासन आदेश असूनही कायम सेवेत सामावून घेत नसल्याचा हा विषय केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून,संपूर्ण आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या हक्कांशी संबंधित असल्याचे बोलले जात आहे.जर शासन आदेशांचे पालन होत नसेल आणि अधिकाराचा गैरवापर होत असेल,तर भविष्यात अशा घटना वाढण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणाची निपक्ष व पारदर्शक चौकशी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे आहे. जिल्हा प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, अर्जदाराच्या तक्रारींची दखल घेतली जाते का,तसेच आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर कोणते निर्णय घेतले जातात, याकडे आता संबंधित इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांचेही लक्ष लागले आहे.त्याच प्रमाणे जिल्हा प्रशासन सदर कर्मचाऱ्याच्या न्यायाच्या मागणीला प्रतिसाद देते की संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठीशी घालते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## संक्षिप्त

### प्रभागाचा चा सर्वांगीण विकास हाच आमचा निर्धार: भास्कर आबा दानवे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसवेक भास्कर आबा दानवे यांच्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ.ज्योती रवी सले, सौ.पद्मा अजित मानधनी व श्री.कल्याण जगदीश भदनेकर हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले असून, या विजयाच्या निमित्ताने वैभव कॉलनीच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, माझ्यासह सौ. सुशीला भास्कर दानवे, सौ. ज्योती रवी सले, सौ. पद्मा अजित मानधनी व श्री. कल्याण भदनेकर आम्हाला मोठ्या मताधिक्यांनी आपण निवडून दिले असून, नागरिकांचा विश्वासच आपली खरी ताकद असल्याचे सांगत, येणाऱ्या काळात प्रभागातील रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या समस्या सोडवून प्रभाग क्रमांक १ चा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात बोलताना नवनिर्वाचित नगरसेवकांनी स्पष्ट केले की, प्रभाग क्रमांक १ चा विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून, प्रत्येक प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी प्रतिक भैय्या दानवे, जीवन सले, रवी सले, अजित मानधनी आदी यांच्यासह प्रभागातील सांगळे काका-काकू, भाऊराव फदाट, शामराव राठोड, निवरकर , सुशीलकुमार बेघानी, शेख साहेब, काळे साहेब, कपिल दहेकर,मनोज भैय्या वाघ, भरत निवरकर, बबलू टेकाळे, गजानन बागल, विकास राठोड, रवी जाधव, विशाल फदाट, राहुल जामुंदे, सौरभ उंद्रे व आदित्य उगले आदींची उपस्थिती होती.

### जनतेचा विश्वास सार्थ ठरवून नवनिर्वाचित नगरसेवकांनी आश्वासनांची पूर्तता करा : माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी.गणेश सपकाळ/** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेला दणदणीत विजय हा पक्षसंघटना, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांचा परिणाम आहे. जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी आता आपल्या प्रभागातील विकासकामांकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. निवडणूक काळात जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे हेच त्यांचे पहिले कर्तव्य असावे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री मा.श्री. रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.

जालना महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या पुढाकाराने जालन्यातील 'चित्रकूट' निवासस्थानी नवनिर्वाचित नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात भारतीय जनता पार्टीने लढवलेल्या ६५ जागांपैकी विजयी झालेल्या ४१ नगरसेवकांचा सन्मान चिन्ह,शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

विशेष बाब म्हणजे,भास्कर आबा दानवे यांनी केवळ विजयी नगरसेवकांचाच नव्हे,तर पराभूत झालेल्या २४ उमेदवारांचाही शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.पक्षाच्या विजयात प्रत्येक कार्यकर्त्याचे आणि उमेदवाराचे योगदान महत्त्वाचे आहे, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

सत्काराला उत्तर देताना जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले,निवडून येणे ही केवळ सुरुवात आहे.खरे काम आता सुरू झाले आहे.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सर्व नगरसेवकांनी प्रामाणिकपणे,एकजुटीने काम करावे.

या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, रामेश्वर भांदर्गे, बद्रीनाथ पठाडे, सौ. विमलताई आगलावे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, धनराज काबलिये,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. शुभांगी देशपांडे, सरचिटणीस अमोल कारंजेकर, वसंत शिंदे, सुनील पवार, अर्जुन गेही यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित महारॅली उत्साहात संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जालना, दि.२१(जिमाका) : 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील भाविकांना नागरिकांना उपस्थित राहता यावे यासाठी जालना जिल्हा प्रशासानाकडून विविध माध्यमातून व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. या महासोहळ्यात शीख, सिकलीगर, बंजारा,लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन आणि वारकरी संप्रदायातील भगत नामदेव समाज आदी समाजासह इतर समाजातील सुमारे ९ ते १० लाख भाविक सहभागी होणार आहेत.



जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागामार्फत आज जालना शहरातील गांधी चमन ते शिवाजी चौक दरम्यान हिंद-दी-चादर' या कार्यक्रमाच्या अनुषंगाने भव्य महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या महारॅलीत जालना शहर परिसारातील २७ शाळेतील सुमारे १० हजार विद्यार्थी-विद्यार्थीनी या भव्य महारॅलीत सहभागी झाल्या होत्या. श्री गुरू तेग बहादूर साहिबजींचा गौरवशाली इतिहास, त्यांच्या त्यागाची गाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांच्या हाती असलेले फलक आणि जयघोषामुळे शहरातील वातावरण भक्तीमय झाले होते. 'हिंद दी चादर : श्री गुरु तेग बहादूर जी जयघोषाने जालना शहर दुमदुमन गेला होता.

या महारॅलीस जालना तहसीलदार श्रीमती छाया पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्रीमती संगीता भागवत, गटविकास अधिकारी जालना श्री. पवार, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय कांयदे, गिरीश पुजारी, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती मनोज कोल्हे, श्रीमती विनया वडजे, रविंद्र काकडे, सुनील ढाकरके, अशोक गायकवाड, सुनील मावकर, अर्जुन पवार, राजे जाधव, श्री. ठाकूर, गुरुद्वारा कमिटीचे सदस्य जगदीश सेठ, गुरद्वारा पुजारी स्वर्णसिंघजी, गुरमीत सिंग सेना, दर्पण सिंग सुखमनी, उद्धव पवार, मुख्याध्यापक विजय उंबरहांडे, श्री देशमुख, श्री. घुगे, श्री. पिसोरे, श्रीमती गट्टपवार, हेनरी डेव्हीड पठाडे, हितेश जोशी आदींची उपस्थिती होती.

## संधिवात हा ऑटोइम्युनो आजार; नियमित उपचार आवश्यक : डॉ. प्रकाश पायमोडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** संधिवात हा केवळ सांधेदुखीपुरता मर्यादित नसून तो एक ऑटोइम्युनो (स्व-प्रतिरक्षा) आजार आहे. मधुमेह,रक्तदाब व थायरॉईडप्रमाणेच या आजारावरही नियमित,दिर्घकालीन आणि शास्त्रीय उपचार अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन संधिवात तज्ज्ञ डॉ.प्रकाश पायमोडे यांनी केले. सेव्हन हिल,छत्रपती संभाजीनगर येथील पायमोडे संधिवात क्लिनिक येथे सामाजिक उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मोफत संधिवात रोग निदान व जनजागृती शिबिरात ते बोलत होते.

डॉ.पायमोडे यांनी सांगितले की,आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती (खार्गीपिश डूींशा) ही ऑटोइम्युनो आजारात चुकीने शरीरातील स्वतःच्या पेशी व अवयवांवर हल्ला करते.हा हल्ला जेव्हा हात-पायांच्या सांध्यांवर होतो,तेव्हा त्याला संधिवात असे म्हणतात.सुरुवातीच्या टप्प्यात योग्य उपचार न घेतल्यास हा आजार पुढे जाऊन रक्तपेशी,मेंदू,मूत्रपिंड (किडनी) तसेच हृदयावरही गंभीर परिणाम करू शकतो,असा इशाराही त्यांनी दिला.

केवळ वेदनाशामक गोळ्या घेतल्याने तात्पुरता आराम मिळतो;परंतु आजाराचे मूळ कारण नियंत्रणात येत नाही,असे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की,संधिवातासाठी तज्ज्ञांकडून अचूक निदान व नियमित उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे.ज्या प्रकारे कोट्यवधी रुग्ण मधुमेह, थायरॉईड व रक्तदाबासाठी दररोज औषधे घेतात आणि त्यांचे आयुष्य सामान्य राहते,त्याचप्रमाणे संधिवातावरही योग्य औषधोपचार सुरक्षित व प्रभावी ठरतात.वेळीच निदान व सातत्यपूर्ण उपचारांमुळे हा आजार नियंत्रणात ठेवता येतो आणि रुग्ण वेदनामुक्त,सक्रिय जीवन जगू शकतात,असेही त्यांनी नमूद केले.

आज दिनांक २२ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात मराठवाड्याच्या विविध भागांतून आलेल्या रुग्णांनी सहभाग नोंदवला.या शिबिरात सुमारे १०० रुग्णांची तपासणी,मार्गदर्शन व उपचार करण्यात आले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ ऋतुजा,अर्जुन नगरे,सागर मगर,सानवी,मुसाकदिक व अनिकेत पटवारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अंबड येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त माजी नगरसेवक कुमार रुपवते यांच्यावतीने आज (ता.२३) शुक्रवारी शहरातील जुना मोंढा येथील राठी किराणासमोर आयोजित कार्यक्रमात उपस्थित सर्व पक्षीय मान्यवरांनी शिवसेनाप्रमुखांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



या वेळी मा.आ.शिवाजीराव चोथे, दिपकसिंह ठाकूर, हनुमान धांडे, दिनेश काकडे, बाळू गावडे, पंडित गावडे, द्वारकादास जाधव, ओमप्रकाश उबाळे, शामप्रसाद लाहोटी, सुनील कसबेकर, दत्ता लांडे, राजधर पवार, संतोष जिगे, गीताराम मते, महेश कुलकर्णी, रावसाहेब वाळवे, संजय खोरे, समद बागवान, केदार कुलकर्णी, अफरोज पठाण, विठ्ठलसिंह राणा, रमेश शहाणे, शिवप्रसाद चांगले, सौरभ कुलकर्णी, बंडू जाधव, राहुल शहाणे, जितू बुर्ले, संदिप खरात, फिरोज शेख, शाहुल खरात, अमोल वराडे, किशोर मंत्री, नितीन राठी, नंदू पुंड, अन्वर कुरेशी, इंजी.भोजने, कैलाश हरणे, जहागिरदार, विष्णू पुंड, बाबू लांडे, सतीश धुपे, सतीश मालानी, नेमाने मामा, बळीराम राऊत, सूरज गुढे, लक्ष्मण काळबांडे, बळीराम बनकर, संजय संत्रे, गोपी घायाळ, शशिकांत खरात, मनोज भसंदे, रमेश अंबिलवादे, लक्ष्मीकांत पुंडलिक, एकनाथ मिटकर, दिपक मैंद, आरेफ डावरगावकर, सचिन खले, बाबासाहेब कटारे, रवी चांगले, अक्षय भोजने, राजू इंगळे, अक्षय वाघ, गणेश पवार, आदित्य कारके, महेश राऊत, मनीष शेवाळे, बाबू लांडे, किशोर खरात, गुड्डू शेख, शंकर डेरे, अविनाश भोसले, योगेश जैन, गणेश लोहकरे, महेश गुप्ता, अजित उढाण, बाळू पुंड, बाबासाहेब घोलप, संजय जोशी, शाम तिकांडे, रोहन महाजन, अनिरुद्ध भागवत, सावता कटारे, भरत पवार, विनोद इंगळे आदीनी अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिवसेना माजी नगरसेवक कुमार रुपवते, रमेश वराडे, रवी इंगळे, दिपक खरात, दत्ता लोहकरे, श्याम राठोड, सुरेश राजपूत, अनिस तांबोळी, शैलेश दिवटे, अमोल वराडे, सतीश अंबेकर, अख्तर पठाण, संतोष अंबिलवादे, संदिप सदावर्ते, शिवराम भोजने आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ शाखा अंबड**
**(अवसायनात)**
**मुख्य पत्ता- शाहू कॉलनी शिक्षक पतसंस्थेच्या वार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव**
**०३ करवा कॉम्प्लेक्स आयसीआयसीआय बँके समोर जालना बीड रोड अंबड**
Email:-rajasthanimultistatecooperativgmail.com
जा.क्र./मु.का./२०२५-२६ दिनांक २४/०१/२०२६

**जाहीर लिलाव क्र.०२**

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ शाखा अंबड, या बँकेच्या शाखेमध्ये उपलब्ध असलेले लॉकर व तसेच उपलब्ध असलेली तिजोरी, लाकडी फर्निचर, जशे आहे तसेच व विनातक्रार या तत्वावर त्या स्थितीत विक्रीसाठी निविदा मागविण्यात येत आहे. यासाठी इच्छुकांनी दि. ०७/०२/२०२६ पर्यंत बँकेकडे सिलबंद निविदा सादर करावी. सर्वाधिक रकमेची निविदा मंजूर करण्यात येईल व संबंधीतास त्या बाबत कळविण्यात येईल. नियमा प्रमाणे अथवा अति कमी रकमेची निविदा प्राप्त झाल्यास निविदा रद्द करण्याचा अधिकार अवसायकास राहील.

**स्वाक्षरीत**
**सुरज जगदाळे**
**अवसायक**
**राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. परळी वैजिनाथ शाखा अंबड मो. नं.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813